# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल


**शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल, जि. रायगड-४१० २०६.**

ई-मेल पत्ता :- jtdire.१११५@gmail.com दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२-२७४५३८२०)


जा.क्र.: विससं/उशि/कोविप/शिष्यवृत्ती/२०२१/ दि.१५.११.२०२१

आवक क्र. 2409
दिनांक 15/11/2021
विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण ,कोकण विभाग, पनवेल

प्रति,

**प्राचार्य / संस्था प्रमुख,**
सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, विना-अनुदानित व कायम विना-अनुदानित
कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व अध्यापक महाविद्यालये,
जि. ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग.

**विषयः महाडीबीटी पोर्टलवरुन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी अर्ज भरणे तसेच संबंधित अर्जांची महाविद्यालय व विभाग स्तरावरुन पडताळणी करणेसाठी मुदतवाढ देणेबाबत...**

**संदर्भः** मा.संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.उशिसं/शिष्य.२०२१/डीबीटी/१३३०९, दि.११.११.२०२१

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते की, राज्यशासनाच्या विविध विभागांच्या शिष्यवृत्ती योजनांची एकत्रितपणे अंमलबजावणी करणेसाठी विकसित केलेल्या महाडीबीटी पोर्टलवर उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या 14 शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे.

**सन 2020-21 करीता ज्या विद्यार्थ्यांनी अद्यापही अर्ज भरलेले नाहीत, अशा विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यासाठी दि.30.11.2021 पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.** यापुढे मुदतवाढ देण्यात येणार नसुन पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी मुदतीमध्ये अर्ज भरणेसाठी त्यांचे महाविद्यालय / संस्था / विद्यापीठ यांनी कळविण्यात यावे.

विद्यार्थ्यांनी भरलेले शिष्यवृत्ती अर्ज संस्था तसेच विभाग स्तरावरुन दररोज निकाली काढणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत संस्था स्तरावर अर्ज प्रलंबित ठेऊ नयेत. प्रलंबित राहीलेल्या अर्जांबाबत भविष्यामध्ये उदभवणाऱ्या बाबीस संबंधित विद्यापीठाचे कुलसचिव, महाविद्यालये / शैक्षणिक संस्था यांचे प्राचार्य जबाबदार राहतील.

विद्यार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याचा शिष्यवृत्ती लाभ देण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांची उपस्थिती बाबतची माहिती नमुद करुन विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्जांवर तात्काळ कार्यवाही करण्यात करण्यात यावी. इन्स्टिटयुट लॉगीन वरुन उपस्थिती बाबतची माहिती नमुद करुन शिष्यवृत्ती अर्ज पुढील टप्प्यावर पाठविल्याशिवाय संबंधित विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती रक्कमेचे वितरण होत नाही.

तसेच सद्यस्थितीत उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांचे लाभ वितरण सुरु झालेले आहे. विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रोफाईल लॉगीन करुन त्यांचे अर्जांची स्थिती तपासावी. डीडीओ व्दारे लाभ वितरीत केल्यास रिडीम बटण सक्रिय होते. शिष्यवृत्ती मंजूर विद्यार्थ्यांना महाडीबीटी व पीएफएमएस प्रणालीव्दारे आधार लिंक बँक खात्यात लाभ देण्यात येतात. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांचे बँक खातेशी आधार संलग्न नाही अशा विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती लाभ मिळणेसाठी त्वरीत बँक खातेशी आधार संलग्न करावे.

विद्यापीठ / संस्था / महाविद्यालय स्तरावरील एकही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीबाबत माहिती न मिळाल्यामुळे शिष्यवृत्तीपासून वंचित राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विद्यापीठाचे कुलसचिव, महाविद्यालये / शैक्षणिक संस्था यांचे प्राचार्य जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

**(ज्ञानदा कदम)**
**प्रशासन अधिकारी,**
**उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल**

प्रत:

मा.संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सादर.

J.B.S.P. Sanstha's
Changu Kana Thakur Arts, Commerce & Science College,
New Panvel.(Autonomous)

**Date : - 15/11/2021.**

# (Date Extended)

## SCHOLARSHIP

The students belonging to **SC/ST/VJ-NT/SBC/OBC/EBC** category are hereby informed that the Government of India Scholarship/Freeship procedure for the **academic year 2020 - 2021 has been extended and last date is 30th November 2021 .**

The concerned students should fill the scholarship form by online mode and get the print of it and submit it to Mr. Bhagat S.G. and Mr. Gondhali P.K. in the college office.

The website is :

**https://mahadbtmahait.gov.in**

(Note:- In case of IT/CS/BMS courses only for SC/ST students will get Scholarship/Freeship)

C.K.T.A.C.S. College New Panvel ★ AUTONOMOUS ★

I/C Principal
Changu Kana Thakur
Arts Commerce And Science College,
New Panvel.